महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १५४ वा | दिनांक : १६/०३/२०२५ | वार : रविवार

## माझ्या खात्यातून पैसे घेताना संमती घ्यायला हवी होती - संजय शिरसाट



**मुंबई :** अर्थखात्याने समाजकल्याणचा ३ हजार कोटी, तर आदिवासी विभागाचा तब्बल ४ हजार कोटींचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळता केला. यावर सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री, अर्थमंत्र्यांनी या खात्याला कट लावला तर कामे कसे होतील? असा सवाल संजय शिरसाट यांनी केला. अशा पद्धतीने कट मारल्यास उद्रेक होईल, असा इशाराही शिरसाट यांनी दिला. तसेच सामाजिक न्याय व आदिवासी विभागाचे पैसे कपात करू नये, असेही ते म्हणालेत.

लाडक्या बहिणींसाठी पैसे जमवताना सरकारची दमछाक होताना दिसून आले. लाडकी बहीण योजनेचा राज्याच्या सरकारी तिजोरीवर मोठा भार पडल्यामुळे अर्थविभाग वेगवेगळ्या विभागांचा निधी पळवून या योजनेसाठी निधी उभा करण्याचा प्रयत्न करत आहे. आदिवासी व दुर्बल घटकांच्या विकासासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या समाजकल्याण व आदिवासी विभागाचा सुमारे ७ हजार कोटींचा निधी वळवण्यात आला. यावर संजय शिरसाट यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

लाडकी बहीण योजना चांगली आहे. त्यासाठी पैसे दिले पाहजे. यात दुमत नाही. विकासाची कामे कमी केले, हरकत नाही. मात्र माझा आक्षेप आहे की सामाजिक न्याय व आदिवासी खात्याला घटनेच्या तरतुदीनुसार पैसे द्यावे लागत आहे. यात कट करता येत नाही. लाडकी बहीणसाठी चार हजार कोटी, पंतप्रधान आवास योजनेसाठी १५०० कोटी, ऊर्जा विभागासाठी १४०० कोटी, असा एकूण सात हजार कोटींचा फटका माझ्या विभागाला बसला आहे, असे संजय शिरसाट यांनी म्हटले.

हा विभाग मागास लोकांना प्रवाहात आणण्यासाठी आहे. मुख्यमंत्री, अर्थमंत्र्यांनी या खात्याला कट लावला तर कामे कसे होतील? यासाठी तरतूद करून द्या, असे माझे मत असल्याचे संजय शिरसाट म्हणाले. सामाजिक न्याय विभाग हा सर्व सामान्य, दलित, वंचितांसाठीचा विभाग आहे. त्याच विभागाला कट लावला तर या समाजाच्या कल्याणाचे काय होणार? असा प्रश्न उपस्थित करत अशा पद्धतीने कट मारल्यास उद्रेक होईल, असा इशारा मंत्री संजय शिरसाट यांनी सरकारला दिला.

सामाजिक न्याय व आदिवासी विभागाचे पैसे कपात करू नये, यासाठी मी मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांना पत्र लिहून मागणी करणार असल्याचे शिरसाट यांनी सांगितले. माझ्या खात्यातून पैसे घेताना संमती घेतली पाहिजे होती. संमती मागितली असती तर मला देता आली नसती. हे बंधन आम्हाला कायद्याने दिले आहे, असेही ते म्हणाले.

दरम्यान, संजय शिरसाट यांनी निधी कपातीला विरोध केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी त्यांची बाजू घेतली आहे. आदिवासी मागासवर्गीय निधी कापण्यावरून यांच्या मंत्री संजय शिरसाट यांनी विरोध केला आहे, मी मनापासून संजय शिरसाट यांचे अभिनंदन केले आहे. शिरसाट हा पहिला माणूस आहे, आजपर्यंतच्या मंत्रिमंडळात अनेक मंत्री बघितले, मागासवर्गीयांचा निधी मुद्दामहून कापला जातो आणि संजय शिरसाट यांनी हिंमत दाखवली आणि विरोध केला, मी उघडपणाने शिरसाट यांच्या बाजूने आहे, असेही आव्हाड म्हणाले. संजय शिरसाट यांच्याबद्दल मला प्रचंड आदर निर्माण झाला आहे, त्यांनी या महाराष्ट्र सरकारचा चेहराच उघडा करून टाकला, असेही आव्हाड यांनी म्हटले.

## कोणत्याही परिस्थितीत शिवाजी विद्यापीठाचे नामांतर होऊ देणार नाही - शिवप्रेमी



**कोल्हापूर :** शिवाजी हा शब्दच मराठी माणसाची अस्मिता आहे. या शब्दामध्येच प्रचंड ताकद आहे. छत्रपती शिवाजी महाराज आमचा स्वाभिमान आहे. या अस्मितेशी कोणी प्रयत्न करू नये. शिवाजी विद्यापीठ हे नाव ठेवताना बराच विचार करत हे नाव फायनल करण्यात आले आहे. आम्ही शिवाजी विद्यापीठाचे नाव बदलू देणार नाही, असे शिवप्रेमींनी म्हटले आहे.

कोल्हापूरच्या बाहेरचे लोकं जर आम्हाला शिकवणार असतील तर आम्ही ते ऐकणार नाही. ९९ टक्के कोल्हापूरकरांना विद्यापीठाचे नाव बदलू नये असेच वाटत आहे. कोल्हापूरकर सुज्ञ आहेत. २०१९ मध्ये असा प्रस्ताव आला होता तेव्हा नमते घ्यावे लागले आताही नमते घ्यावे लागेल, असे मत कोल्हापूरकरांनी व्यक्त केले आहे.

इतिहास संशोधक जयसिंगराव पवार यावेळी म्हणाले की, शिवाजी हा शब्दच मराठी माणसाची अस्मिता आहे. या शब्दात प्रचंड ताकद आहे. त्यामुळे विद्यापीठाला दिलेलं नाव योग्य आहे. ते कोणी बदलण्याचा प्रयत्न करू नये. जर कोणी बदलणार असेल तर त्यांना नाव मागचा इतिहास समजावून सांगू. अन्यथा अशा प्रवृत्ती ठोकून काढल्याशिवाय पर्याय नसल्याचे त्यांनी सांगितले.

वसंतराव मुळीक म्हणाले की, शिवाजी विद्यापीठ स्थापनेपूर्वी त्यांचे नाव ठरले आहे, ते बदलू नये. हे नाव ठेवताना विचार करत हा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी एक स्थमिती नेमण्यात आली होती. त्यांनी यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना शिवाजी विद्यापीठ नाव ठेवावे असा प्रस्ताव समोर केला. त्यावेळीही छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ नाव असावे असे म्हटले होते. पण यशवंतराव चव्हाण यांनी स्पष्ट सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ नाव दिले तर CSM विद्यापीठ हे नाव होणार आहे. यावेळी त्यांनी बडोदा विद्यापीठाचे मुंबईतील विद्यापीठाचे आणि कोल्हापुरातील छत्रपती प्रमिला राजे रुग्णालयाला आपण सर्व जण सीपीआर म्हणत आहोत. आता हे छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे सर्वांचे दैवत आहे. परंतू शिवाजी नावामध्ये एकेरी उल्लेख होत नाही. या नावात एक आदर असल्याने तुम्हा आम्हाला सर्वांची नाळ सर्वसामान्य माझे विद्यापीठ शिवाजी विद्यापीठ हे जुळले आहे. त्यामुळे हे नाव बदलू दिले जाणार नाही.

## फोनवर बोलताना 'हॅलो' ऐवजी 'जय शिवराय' म्हणा

**सांगली :** कोणताही फोन आला तर, सुरुवातीला हॅलो ऐवजी जय शिवराय म्हणा, अशा सूचना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांना करण्यात आल्या आहेत. सांगली येथे पार पडलेल्या मेळाव्यातून या सूचना देण्यात आल्या आहेत. आता येथून पुढे फोन लावल्यावर जय शिवराय बोलायचे, सुरुवात सांगलीतून होईल हा प्रांताध्यक्षांचा आदेश आहे, असे आमदार शशिकांत शिंदे मेळाव्यात बोलताना म्हणाले. तसेच पक्षासोबत शेवटपर्यंत लढा, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

सांगली येथे आज प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, हर्षवर्धन पाटील, शशिकांत शिंदे, रोहित पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा मेळावा पार पडला. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या आदेशानुसार हा मेळावा घेण्यात आला. विधानसभा निवडणुकीत दारुण झालेल्या पराभवानंतर कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. आमदार शशिकांत शिंदे यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून बोलताना आता फोनवरुन हॅलोऐवजी जय शिवराय बोलायचे, अशा सूचना दिल्या आहेत.

आमदार शशिकांत शिंदे म्हणाले की, सांगली जिल्ह्याचा बालेकिल्ला आपण शाबूत ठेवला. परंतु, दुर्दैवाने सातारामधील बालेकिल्ला मात्र नेस्तनाबूत झाला आहे. गावा-गावांमध्ये ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज शेवटपर्यंत लढले, त्यांनी हार मानली नाहीत. त्यांच्यासोबत जे शेवटपर्यंत लढले ते इतिहासामध्ये अजरामर झाले. तसेच, तुम्ही देखील पक्षासोबत शेवटपर्यंत लढा, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे. आगामी काळात तालुकास्तरावर मेळावे घेतले जातील. जो कार्यकर्ता सक्षम आहे, त्याच्याकडे पक्षाची जबाबदारी देण्यात येईल. तसेच जो पक्षात येण्यास इच्छुक आहे, त्याला देखील जबाबदारी देण्याचा विचार होईल, असेही शिंदे यांनी म्हटले.

विधानसभा निवडणुकीत भाजपने व्यवस्थित पेरणी केली. त्यामुळे आपल्याला पराभवाला सामोरे जावे लागले. आता आपल्याला पुन्हा नव्या उमेदीने उभे राहावे लागणार आहे. एकीकडे महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्याच्या घोषणा केल्या जातात आणि दुसरीकडे मात्र धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे शिंदे म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ मार्च २०२५

## हृदयी अमृत, नयनी पाणी! वेळेप्रसंगी कठोर वाणी! स्त्री जन्माची कहाणी!



स्त्रिया जेवढ्या हळव्या असतात तेवढ्या त्या वेळेप्रसंगी कठोरही होतात.अनादी काळापासून स्त्रियांना पुरुषसत्ताक व्यवस्थेने दुय्यम दर्जा देऊन कनिष्ठ ठेवले होते.त्या व्यवस्थेतील मानवनिर्मित ३३ करोड पैकी एकाही दैवताने स्त्रियांना समतेची,समानतेची वर्तणूक देण्यासाठी पुढाकार घेतलेला नाही.घेणार कसे? ते वास्तवात असतील तर ना! स्त्रियांना हाल,अपेष्टा सहन कराव्या लागणारा तो काळ आता गेला.प्रत्येक तरुणाईची व पुरुषाची स्त्री हि माता,बहिण,मावशी,काकी अशा अनेक पवित्र नात्यांची भूमिका ती निभावीत असते.गत काळातील किंवा सध्याच्या काळात सुसंस्कारी स्त्रीला कोणत्याही परिस्थितीत जुळवून घेण्याची अफाट शक्ती जन्मजात तिला लाभलेली असते.आज ती प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन पुढे जात आहे.फक्त संधी मिळायला हवी.आधुनिक युगातही स्त्रीने व्यवहारिक जगातल्या अदभुत अथक परिश्रम, साहस, जिद्द, साहस,जिद्द,संयम,दूरदृष्टी आणि प्रतिभेच्या जोरावर अमिट असा प्रत्येक क्षेत्रात ठसा उमवटलेला आहे.मानवी संवेदना,प्रेम,करुणा,मैत्री,दया आणि वात्सल्य या भावनांनी स्त्रियांचे हृदय ओतप्रेत भरलेले क्षणोक्षणी दृष्टीक्षेपात येते.अशा या मधुर भावना आणि सोज्वळ स्वभावामुळे तद्वतच शिलसंपन्न गुणांमुळे स्त्रीच्या बाह्य सौंदर्यापेक्षा वागणुकीतून,चरित्र व चारित्र्यातून दिसणारे सौंदर्य अधिक तिच्या व्यक्तिमत्वात भर घालीत असते.यामुळेच तिला,स्वतःवेदना सहन करून जग जननी म्हणून संबोधले जाते. ज्या क्षेत्रात पुरुषी वर्चस्व होते त्या क्षेत्रात सुद्धा आजच्या स्त्रीने घव घवीत यश संपादन केलेले आहे.आपल्या या भारत देशाच्या संरक्षणासाठी संहारक अण्वस्त्र क्षेत्रात प्रचंड कठीण असलेल्या,जीवाची पर्वा न करता मिसाईल क्षेत्रात ५००० किलो मीटर मारक असलेल्या 'अग्नी' या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी करून स्त्रिया कुठेच जागतिक पातळीवर कमी नाहीत हे दाखऊन देणारी पहिली भारतीय स्त्री म्हणजे डॉ के. टी.थॉमस होत.स्वराज्य निर्मितीसाठी छत्रपती शिवाजी राजांना घडविणारी माँ जिजाऊ,बाळ पाठीवर बांधून घोड्यावर तलवारीसह"मेरी झांशी नहीं दुंगी" म्हणणारी झाशीची राणी,ताराबाई होळकर,झलकारी देवी, स्त्रियांना समानतेचा शिक्षणाचा हक्क मिळावा म्हणून शेण,चिखल अंगावर झेलून त्यांना शिक्षित करणाऱ्या प्रथम युगस्त्री माता सावित्रीबाई फुले,फातिमा शेख,ताराबाई शिंदे,वेळेप्रसंगी उपरोक्त म्हटल्याप्रमाणे कठोर वाणी व निडर भूमिका घेऊन बलत्काऱ्यांना कंठस्थानी गोळ्या झाडणारी फुलनदेवी अशा या सर्व असामान्य स्त्रियांचे व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व विसरून कसे चालेल.राज घराण्यातील सुख सोयींनी युक्त असून सुद्धा युद्धात जखमी झालेल्या सैनिकांवर उपचार व सुश्रुषा करून परिचार्याचा आदर्श घालून देणारी फ्लोरेन्स नायटिंगेल,अवकाश कन्या कल्पना चावला,अंतराळ वीरांगणी सुनीता विल्यम,पहिल्या डॉक्टर झालेल्या आनंदीबाई जोशी या सगळ्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.विविध धर्म आणि जातींचा समूह असणाऱ्या खंडप्राय भारत देशाचे समर्थ व बिनधास्तपणे धुरा सांभाळणाऱ्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी,राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील,आताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु,सन 1963 पासून भारतातील राज्यात 16 महिलांनी मुख्यमंत्रिपद भूषविले आहे.त्यात प्रामुख्याने तामिळनाडूच्या दिवंगत मुख्यमंत्री जे.जयललिता,शीला दीक्षित,सामाजिक व आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या मदर तेरेसा,मेधा पाटकर,या सर्व उपरोल्लेखित महिला उच्च शिक्षित झाल्यामुळे त्यांना पुरुषांच्या बरोबरीने नव्हे तर त्यांनाही मागे टाकून उच्च स्थानी विराजमान झालेल्या आपण पहात असतो.हे सर्व कशामुळे घडले?याची माहिती किती महिलांनी ठेवलेली आहे.हे वाचक वर्गाने ठरवायचे आहे.ती जाणीव त्यांच्या वागण्यातून दिसून येते का?शिवाय बसपाच्या बहीण मायावती,अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपले कार्य कर्तुत्व दाखऊन दिलेले आहे.एके काळी महिलांना शिक्षणाची बंदी होती.ती बंदी कुणी केली होती.आता त्या विषयात जायचे नाही.परंतु भूतकाळ,इतिहास हा विसरायचा नसतो.जो विसरतो.मग परत मागचे दिवस यायला वेळ लागत नाही.त्या काळी स्त्रीला रांधा,वाढा आणि उष्टी काढा,किंबहुना स्वयंपाक गृह ते शयनगृहात ती बंदिस्त होती.एवढेच नव्हे तर तिला आपला जीवनसाथी निवडण्याचा अधिकारही नव्हता.परंतु आता ती अंगणात यायला लागली आणि जगात वावरू लागली.याची जाणीव तिने ठेवायला हवी.ही जाणीव तिला विद्यालयात,महाविद्यालयात शिकविली गेली नाही.तिच्या या उतुंग उत्कर्षाच्या मागे फक्त एकच माता होती आणि सर्व श्रेय त्या मातेला जाते ती माता म्हणजे माता रमाई.याचे कारण त्या मातेने हाल अपेष्टा सहन करून आपले चार मुले गमाऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पाठीशी ठाम उभ्या राहिल्या.म्हणून डॉ.बाबासाहेब जगात सर्वात जास्त पदव्या घेऊन भारतीय संविधानाचे एकमेव आद्य शिल्पकार ठरले.शिक्षणाची सर्वांसाठी तरतूद संविधानात त्या महामानवाने केली.त्यामुळे महिला आज शिक्षित होऊन ताट मानेने जगत आहेत.उच्च पदावर विराजमाना होत आहेत.याचाच अर्थ शिक्षणात किती शक्ती आहे.याचा प्रत्यय येतो.राजकारण,साहित्य,आरोग्य, क्रीडा,कला,शिक्षण,वित्तक्षेत्र तसेच समाजकारण आणि सांस्कृतिक अशा या भिन्न भिन्न क्षेत्रात पुरुषांचे असलेलं या क्षेत्रातील वर्चस्व आणि मक्तेदारी मोडून स्त्रिया पुढे जाऊन त्या सुद्धा कमी नाही. हे त्या स्त्रिया दाखऊन देत आहेत.भारतातील सर्वात मोठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पहिल्या महिला अध्यक्षा अरुंधती भट्टाचार्य,देशातील अग्रगण्य आयसीआयसीआय बँकेचा अध्यक्षा चंदा कोचर तसेच आंतरराष्ट्रीय मॉनिटरी फंडच्या अध्यक्षा ख्रिश्चन लॉगोर्ड या महिलांनी अती महत्वाच्या पदांवरील जबाबदाऱ्या उत्कृष्टपणे सांभाळलेल्या आहेत.अशा शेकडो महिलांची नावे घेता येतील.ज्या क्षेत्रात स्त्रियांनी उत्तम नेत्र दीपक कामगिरी केलेली आहे.या सर्व जबाबदारी पार पाडीत असताना घरातील "उत्तम मॅनेजमेंट" सुद्धा स्त्रियाच करीत असतात.आपल्या घरातील मुलं बाळं,सासू - सासरे,पति,दिर,नणंद,भावजय आणि पाहुणे राहुणे,लग्न कार्य आणि विशेष म्हणजे सर्वात महत्वाचे घरातील आर्थिक बजेट!तेही तुटपुंज्या उत्पन्नात घर खर्च चालवून बचत करून,योग्य वेळी काढून देणाऱ्या स्त्रिया यांना "फंड मॅनेजर" म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.सहनशीलता,मेहनत,जिद्द, चिकाटी आणि सातत्य या गुणांमुळे स्त्री आज पुरुषांनाही अनेक क्षेत्रात मागे टाकीत आहे.अवघड यशालाही ती गवसणी घालीत आहे.परंतु सदर लेखाचा शेवट करताना एक खंत मनाला वाटते,दुःख होते.ते यासाठी की जिकडे तिकडे वर्तमान वृत्तपत्रात, टी.व्ही.लावला तर बलात्कार,विनयभंग ,लैंगिक शोषण हे सर्व घडताना दिसत आहे.याला कारणीभूत कोण आहे? याचा विचार करून सरकारने योग्य पाऊले उचलायला हवीत.सर्वच गोष्टी कायद्याने,नियम करून शक्य, साध्य होत नसतात. त्यासाठी सुसंस्कृती व सुसंस्कार घडणे सुद्धा जरुरीचे आहे.समाजाने सुद्धा स्त्रियांची काळजी घेणे आवश्यक आहे.तिच्यात विश्वास निर्माण व्हायला हवा की पुरुषांप्रमाणे मी सुद्धा या भारत देशाची नागरिक म्हणून एकटी बाहेर पडू शकेल.आज ती स्वतःच्या प्रगतीसाठी एकटी घराबाहेर पडत आहे.ती कुणाची तरीबहिण,आई,मावशी आहे हि भावना समाजात वृद्धिंगत होणे गरजेचे आहे.देशाची प्रगती जर बघायची असेल तर ती स्त्रियांच्या शिक्षणावर अवलंबून आहे.घराचे सौंदर्य म्हणजे स्त्री आहे.माता सावित्रीबाई फुलेंनी म्हटले की जिच्या हाती पाळण्याची दोरी!तीच या जगाचा उद्धार करी!जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा!

**कवी व लेखक**
**भूपती अर्जुन मोरे, ठाणे.**
**मो.९९९४३८६२७७.**

## शिक्षक समितीच्या सत्यागही आंदोलनात सहभागी व्हा - शिक्षक समिती

**कन्नड(अरुण थोरात):** दि.१५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या शासनादेशानुसार महाराष्ट्र राज्यात शासनाने नवीन संचमान्यता धोरण लागू करण्याचे ठरविले आहे. - दि.१५ मार्च चा नवीन संचमान्यतेचा शासन आदेश शिक्षक आस्थापनेवर प्रतिकूल असे दूरगामी परिणाम करणारा असल्याने या शासन निर्णया विरूद्धच्या शिक्षक समितीचे राज्यव्यापी धरणे सत्याग्रह आंदोलनात सर्व शिक्षकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षक समिती जिल्हा शाखा छत्रपती संभाजीनगर कडून करण्यात आले आहे.नवीन संचमान्यतेचा शासन आदेश शिक्षक आस्थापनेवर प्रतिकूल असे दूरगामी परिणाम करणारा आहे. त्यातही २० पटाच्यावरच ०१ ते ०७ च्या शाळेत लहान वर्गांना एक कायम शिक्षक मिळेल तर मोठ्या वर्गाला पटानुसार ३५ ला एक पदवीधर शिक्षक मिळेल. महाराष्ट्राचा विचार करता १ ते ७ च्या शाळेत दोनच शिक्षक त्यात एक उपशिक्षक व एक पदवीधर ही आस्थापना तयार होईल, शिवाय - मुख्याध्यापक पदाचा कार्यभार आहेच तसेच सात - वर्ग प्रत्येक वर्गाच्या आठवड्यातून घ्यावयाच्या ४८तासिका, एका वर्गाचे सहा ते नऊ विषय आणि ऑनलाईन ऑफलाईन कामाची न संपणारी रांग यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याची शक्यता कमी आहे. हा शासन निर्णय शिक्षक आस्थापनेवर प्रतिकूल परिणाम करणारा तसेच बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ ला छेद देण्याबरोबरच भारतीय संविधानातील अनुच्छेद २१अ बालकाच्या शिक्षणाच्या मुलभूत हक्कावर घाला घालणारे नवीन संचमान्यतेचे धोरण आहे, पदवीधर शिक्षक ३५ पटाला देताना वर्गानुसार ६ ते ८ साठी विषयनिहाय पदवीधर वर्गाच्या संख्येनुसार बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ मधील कलम २५ व २६ व अनुसूची मधील तरतुदीनुसार दयायचे असताना फक्त पटाचाचा विचार करून पदवीधर पदे दिलेली आहेत, वर्ग अध्यापनाबरोबरच मुख्याध्यापक पदावरील कार्यभार सांभाळताना शिक्षकांची दमछाक होत आहे. ऑनलाईन तसेच ऑफलाईन कामाची मांदीयाळी प्रशासकीय स्तरावरून शिक्षकांसमोर नियमित आलेली असते. त्याच प्रतिकूल परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत आहे व भविष्यात तो वाढत जाणार आहे, या सर्व बाबींचा विचार करूण दि.१५ मार्च २०२४ च्या संच मान्यतेच्या शासन निर्णयाविरोधात दि. १७ मार्च रोजी राज्यभरातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या जिल्हा शाखांचे वतीने एक दिवसीय राज्यव्यापी धरणे सत्याग्रह आंदोलन करण्यात येत आहे, या आंदोलनात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व शिक्षकांनी स्वयंस्फुर्तिने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष विजय साळकर, जिल्हा सरचिटणीस रंजित राठोड, राज्य प्रवक्ते नितीन नवले, मराठवाडा विभागीय अध्यक्ष शाम राजपूत, मराठवाडा विभागीय प्रसिध्दीप्रमुख सतीश कोळी, जिल्ह्यातील राज्य, जिल्हा, तालुका तथा सर्व पदाधिकारी यांनी केले असल्याचे प्रसिध्दी प्रमुख सतीश कोळी यांनी कळविले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ मार्च २०२५


## शिक्षणाचा भुलभुलैया



काय घ्यावे शिक्षण
हल्ली पोरांनी आता
जिकडे तिकडे चोहिकडे
कमालीची उदासिनता

नाही नोकरी
शिक्षणात आता
बहुजनांचे खच्चीकरण
राजकारण्यांचा नुसता बोलबाला

म्हणे कौशल्याचे शिक्षण
सरकारची सारी फसवाफसवी
बदलती शैक्षणिक धोरण
त्यात सुशिक्षिताचे मरण

हिंदुत्वाच्या गोळीने
साऱ्यांना घायाळ केले
चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा लावला फास
शिक्षणाचे केले बाजारीकरण

दाबला गळा लोकशाहीचा
भ्रष्टाचारी लोकप्रतिनिधी बोलेना
नवीन शैक्षणिक धोरणात
बारा बलुतेदारीच्या खुणा

हल्ली शिक्षणाचा
नुसता भूलभुलैया
प्राध्यापक, कुलगुरू पदासाठी
आता पात्रताविना नोकरी

लाज वाटू द्या जरा
हे असे करणे खरे नाही
निवडून आलो ज्यांच्या जीवा
त्यांना मातीत गाडने बरे नाही.


**प्रा. डॉ. सतीश मस्के**
**मो.9423397484**


## शेतकऱ्याच्या अडीच लाख रुपयाच्या पॉलिथिन वर चोराने मारला डल्ला




**वाशिम (महेश मुंढे) :** - मंगरुळपीर तालुक्यातील शेलुबाजार येथील दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अकोला शाखा शेलुबाजार येथे चोरीची घटना घडली आहे. शेतकऱ्याची अडीच लाख रुपये असलेली पॉलिथिन भाजी पाला असलेल्या थैलीत ठेवले व ती थैली मोटरसायकल वर अटकून ठेवली होती. मोटरसायकल वरून पैशाची थैली चोराने लंपास केली असल्याची घटना घडली.शेलुबाजार येथील दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अकोला शाखा शेलुबाजार मधून भावराव बाजीराव देशमुख रा.पेडगाव यांनी दि.१२ दुपारी २ वाजता दरम्यान काढलेली २.५ लाख रुपयांची रक्कम बँकेत बसूनच मोजून घेतली त्यानंतर पिवळ्या कलरच्या पॉलिथिन मध्ये पाच पाचशे रुपयांच्या नोटांचे पाच बंडल ठेवलेत व ती पॉलिथिन बाजार करून आणलेल्या थैलीमध्ये ठेवले व मोटरसायकलला मागच्या साईडला अडकवून बस स्टॅन्ड चौकाकडे येत असताना चोराने थैली मधून पैसे असलेली पॉलिथिन काढून घेतली. यांनी बाजार रोड वरून कारंजा रोड पर्यंत ये पर्यंत यांच्या लक्षात आले नाही. परंतु कारंजा रोडवर जेव्हा मोटरसायकल उभी केली तेव्हा आपल्या पिशवीतने पैशाची पिशवी नसल्याचे त्यांच्या लक्षात आले तेव्हा संबंधित विभागाला संपर्क साधून ही माहिती देण्यात आली. मंगरूळपीर पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुधाकर आडे व डिबी पथकाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन सीसीटीव्ही कॅमेरे तपासले.पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## “ ग्रंथालय आपल्या दारी ” या उपक्रमानेलोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या ९३ जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस कृतीशील अभिवादन




**कन्नड :** महाराष्ट्राच्या राजकारण, समाजकारण, सहकार आणि शिक्षण क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांचा तेजस्वी, वैचारिक वारसा ग्रंथालयाच्या माध्येमातून जपला आणि जोपासला जात आहे. पवार साहेब केवळ राजकीय नेतेच नव्हे तर ते एक विचार, एक चळवळ आणि वैचारिक प्रगल्भता असणारे समाजाभिमुख व्यक्तिमत्व होते. समाजहितासाठी त्यांनी केलेले कार्य, घेतलेल्या पुढाकार आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. आज त्यांच्या 93 व्या जयंतीनिमित्त "ग्रंथालय आपल्या दारी" या अभिनव उपक्रमाचा प्रारंभ होत आहे, ही निश्चितच समाजाच्या वैचारिक उन्नतीसाठी टाकलेले क्रांतिकारी पाऊल आहे. पुस्तकांची गाडी तालुकाभर अविरत ज्ञानाचा प्रसार करणार आहे, वाचन संस्कृती रुजवणार आहे आणि नव्या पिढीला बौद्धिक संपन्नतेच्या दिशेने प्रेरित करणार आहे. कन्नडच्या मातीत अशी वैचारिक चळवळ फुलवण्याचे ऐतिहासिक कार्य लोकनेते,सहकार महर्षी बाळासाहेब पवार ग्रंथालयाच्या माध्यमातून आदरणीय श्री. मानसिंहजी पवार बापूसाहेब करत आहेत.

साहेबांच्या जयंतीनिमित्त आज "ग्रंथालय आपल्या दारी" या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ होतो आहे. हा केवळ उपक्रम नसून, तो वाचन संस्कृतीच्या जागरणाची चळवळ आहे. आजच्या डिजिटल युगात पुस्तकांकडे दुर्लक्ष होऊ नये, ज्ञानाच्या प्रकाशाने समाज उजळावा आणि वाचनसंस्कृती रुजावी, यासाठी कन्नडच्या मातीत हे ऐतिहासिक पाऊल उचलले जात आहे. या उपक्रमांतर्गत ग्रंथांनी भरलेली एक भव्य गाडी संपूर्ण कन्नड तालुक्यातील गावागावांत, शाळांनशाळांमध्ये फिरणार आहे. जिथे वाचनालय पोहोचू शकत नाही, तिथे हे फिरते ग्रंथालय ज्ञानाचे दीप उजळणार आहे. ग्रामीण भागातील लोकांपर्यंत उत्तमोत्तम ग्रंथ पोहोचावेत, विद्यार्थ्यांना अभ्यासाची नवी साधने उपलब्ध व्हावीत, आणि वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी मिळावी, हा यामागील उद्देश आहे. हा उपक्रम महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागात सुरू होणाऱ्या अतिशय मोजक्या उपक्रमांपैकी एक आहे. त्यामुळे कन्नडच्या वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वारशात ही एक ऐतिहासिक भर आहे. असे मी मानतो.

सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय हे समाजाच्या वैचारिक प्रबोधनाचे केंद्र बनत आहे. या वाचनालयाच्या माध्यमातून आजवर अनेक उपक्रम राबवले गेले आहेत. "संगीत महोत्सव"ज्या व्यासपीठावरून स्थानिक कलाकारांना राष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे, "फिल्म फेस्टिवल"सामाजिक आणि वैचारिक चित्रपटांचे प्रदर्शन, "व्याख्यानमाला" विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या विचारांना संधी देत, लोकप्रश्नांना वाचा फोडणारी व्याख्याने, "फिरते वाचनालय" ज्ञान गावागावांत पोहोचवणारी अभिनव संकल्पना, "पुस्तक प्रकाशने आणि परिसंवाद" नव्या लेखकांना मंच मिळवून देणारे उपक्रम, "स्पर्धा आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष शिबिरे" ज्यातून नव्या पिढीतील विचारशील विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न होत आहे. आदी उपक्रम राबवले जात आहेत.

लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार हे एक धुरंधर राजकीय नेते तर होतेच त्याचबरोबर सामाजिक परिवर्तनाची आस असणारे, तसेच साहित्य आणि सांस्कृतिक चळवळीला बळ देणारे व्यक्तिमत्व तसेच एक ग्रंथप्रेमी, उत्तम वाचक होते, त्यांनी कार्यकर्त्यांमध्येही वाचनाची आवड रुजवली होती. त्यांच्या ग्रंथप्रेमातूनच सुरु झालेले हे वाचनालय व त्यातून सुरू झालेला हा 'ग्रंथसंस्कृती जागर' खऱ्या अर्थाने साहेबांच्या विचार आणि कार्याचा वारसा पुढे घेऊन जात आहे.

दि. 15 मार्च, 2025 रोजी लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या 93 व्या जयंतीच्या पावन पर्वावर हा सृजनशील आणि क्रांतिकारी उपक्रम सुरू होतो आहे. या ऐतिहासिक सोहळ्याला आपण सर्वांनी उपस्थित राहून ज्ञानयज्ञाचा साक्षीदार व्हावे, हीच नम्र विनंती. लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार साहेबांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन विनम्र अभिवादन...!

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ मार्च २०२५


## "काव्यांजली" मानवतावादी विचाराचे चिंतन करणारा कविता संग्रह



नंदुरबारचे कवी चंद्रशेखर पाटील यांचा पहिला कवितासंग्रह काव्यांजली नुकताच प्रकाशित झाला.त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहातून नवखेपणा कुठेच दिसून येत नाही.मनोरंजनात्मक दृष्टिकोनातून मांडणी न करता वास्तववादी विचाराच्या प्रभावातून काव्यांजली अवतरलेला दिसतो.त्यांचा अध्यापनाचा इग्रजी हा विषय आहे, मराठीमध्ये त्यांनी अस्सल रचना केली आहे.अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या काव्याचा घाट पाहिला तर अतिशय साध्या सोप्या शैलीतून मांडणी करून समाजातील विविध विषयावर मार्मिकपणे बोट ठेवले आहे.समाजामध्ये मानवी मूल्यं कशी ढासळत चाललेली आहेत याचे चित्रण त्यांनी काव्यांजली मधून केले आहे.

महामानवांनी आपल्याला कार्यकर्तुत्वातून अनेक महत्वाच्या गोष्टी दिल्या.' आंबेडकर, महामानव भारतीय संविधानाचे शिल्पकार देश वासियांसाठी अनंत त्यांचे उपकार 'स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये देऊन विवेकाची कास धरली. सावित्रीबाई फुले,महात्मा गांधी, संत तुकाराम,मा जिजाऊ, स्वामी विवेकानंद आदींचे आमच्यावर अनंत उपकार आहेत.त्यांनी बहुजन वर्गाच्या स्वातंत्र्यासाठी, सुखदु:खासाठी,न्याय हक्कासाठी लढा दिला म्हणून आज आम्ही चांगले दिवस उपभोगत आहोत म्हणून त्यांच्या कार्याचे कवीने स्मरण केले आहे. त्यांच्या विचाराची ज्योत पेटत ठेवली.त्यांच्या विचाराला नमन केले आहे.

पाटील यांनी हायकू, अभंग, त्रिवेणी, शेलकाव्य, चरण, काव्यांजली, मधूसिंधू,निरजा,दर्पण, द्रोणकाव्य असे कवितेचे विविध प्रकार हाताळले आहेत.ते एक प्रयोगशिल कवी आहेत. शेती, निसर्ग, पीक, पाणी, स्वभाव, स्वार्थ,प्रेम, आपुलकी, मन, बालपण जीवन, पैसा, माहेर, विरह, सण-समारंभ, देव-देवता, राजे,संत,समाजसेवक, पुस्तके,कवीचे जग असे विविध विषय पाटील यांनी हाताळलेआहेत. समाजवास्तव मांडत असताना त्यांची कविता सकारात्मक विचार पेरते. त्यांची कविता आशावादी आहे, परिवर्तन स्वीकारणारी आहे.आपण काव्यांजली कवितासंग्रहाचे स्वागत कराल असा आशावाद बाळगतो. कवीला पुढील लेखनासाठी शुभेच्छा देतो.


**समीक्षक**

**डॉ. नरसिंग अप्पासाहेब कदम**

सदस्य, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य,मुंबई तथा प्रोफेसर छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालय,उदगीर जिल्हा लातूर.९४०४७३१०१०


## "होळी"



होळी सण मोठा
आनंदाचा नाही तोटा
गाणं गात गात करावी साजरी
पोळी खात खात करावी साजरी
करावी होळी दुर्जनांची
आणि दृष्ट रूढी प्रथाची

होळीच्या जाळातून निघावा असा धूर
जात धर्म पंथ सगळ्यांची व्हावी राख
माणसाने जगावे माणूस म्हणून
असा निघावा सुर

होळी करावी दृष्ट रूढी प्रथा जपणाऱ्या मनाची
होळी करावी अज्ञानी अशिक्षित युगाची
होळी करावी जळमटलेल्या, बुरसटलेल्या विचाराची,
अन् होळी करावी स्त्री पुरुष भेद करणाऱ्याची.

होळीतुन निघावा असा जाळ
ती वाटावी क्रांतीची मशाल
ती वाटावी शिवबाची ढाल
अन् ती वाटावी राजे संभाजीची तलवार

ती ढाल करत होती रक्षण स्वराज्याचं
सोशीत पीडित बहुजन दिनदलित मुसलमानाचं
ती तलवार करत होती रक्षण
आई बहीण लेकी बाळीच्या अब्रूचं

होळी आठवावी ती जिच्यात विदेशी वस्तूच पेटविल्या होत्या
अन् होळी आठवावी ती जिच्यात बाबासाहेबासमोर जाळलेल्या
मनुस्मृती
या ग्रंथाची राख झाली होती.

होळी सण साजरा व्हावा असा
तो असावा तुमचा, माझा, याचा आणि त्याचाही.
नको फक्त जातीचा आणि धर्माचा


**डॉ. बाळासाहेब बा. लिहिणार**
**मो.९४२१२४५३०९**


## शैक्षणिक व्यवस्था उद्ध्वस्त करणारा शासन निर्णय रद्द करा

**खुलताबाद : (प्रा.योगेश रावते )** विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ग्रामीण भागातील शैक्षणिक व्यवस्था उद्ध्वस्त करणारा दि.१५ मार्च २०२४ चा शासन निर्णय ताबडतोब रद्द करा. या मागणीसाठी प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने राज्यभरात भव्य आंदोलन करण्यासाठी शिक्षक समिती एकवटली आहे._शिक्षण हक्क कायदा २००९ मधील कलम १९ व २५ नुसार इयत्ता पहिली ते आठवीसाठी विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षक संख्या निश्चित केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न भविष्यात निर्माण होणार आहे. अनेक विद्यार्थ्यांसह प्रामुख्याने मुलींचे शिक्षण थांबणार आहे. त्यातून गळती वाढेल आणि विद्यार्थिनी शैक्षणिक प्रवाहापासून बाहेर पडतील. ही स्थिती केवळ महाराष्ट्रातच निर्माण झालेली आहे.शाळेत २० किंवा २० पेक्षा कमी पटसंख्या आहे. अशा शाळेत नवीन संच मान्यतेनुसार शिक्षकाचे एकही पद मंजूर झालेले नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात २५ हजारांपेक्षा अधिक प्राथमिक शिक्षक अतिरिक्त ठरत आहे. कमी पटसंख्येच्या उच्च प्राथमिक शाळातील वर्गासाठी शिक्षकाचे पदच शिल्लक न राहिल्याने त्या शाळेतील विद्यार्थ्यांना एकही शिक्षक मिळणार नाही.संचमान्यतेचा नवीन शासन निर्णय रद्द करण्यासाठी शिक्षक समिती आक्रमकनव्या संचमान्यतेनुसार प्राथमिक शाळेतील हजारो शिक्षक अतिरिक्त होत आहेत. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात संताप व्यक्त होत आहे. संचमान्यतेचा नव्याने काढण्यात आलेला शासन निर्णय रद्द करावा, या मागणीसाठी शिक्षक समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले. (Teachers Union Agitation)जिल्हा परिषद अंतर्गत विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, उच्च श्रेणी मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक वेतन श्रेणीतील त्रुटी दूर करण्यात याव्या. संच मान्यतेचा अन्यायकारक निर्णय रद्द करावा. जिल्हास्तरावरील शिक्षकांच्या विविध समस्या निकाली काढण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अवगत करून अन्यायकारक संच मान्यतेनुसार २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या ६ वी ते ८ वीच्या वर्गाना शून्य शिक्षक दाखविले आहे. त्यामुळे या वर्गांना अध्यापन करणारे विषय शिक्षक अतिरिक्त होणार आहे. यासाठी शिक्षक समिती आक्रमक झाली आहे. _अन्यायकारक शासन निर्णय रद्द करावा, या मागणीसाठी शिक्षक समिती आक्रमक भूमिका घेणार आहे. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील धरणे आंदोलन जिल्हा परिषद कार्यालय औरंगाबाद यांच्यासमोर होणार असल्याचे शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष श्री.विजय साळकर, रणजीत राठोड, नितीन नवले, शामभाऊ राजपूत, शालिग्राम खिस्ते, राजू ठाकूर, त्रिंबक पुनवटकर, कडूबा साळवे, दिलीप रासने के.डी. मगर, राऊफ पठाण बबन थोरे, जावेद अन्सारी, अशोक डोळस, बबन चव्हाण, दत्तात्रय थोरात, कैलास ढेपले, पंजाबराव देशमुख, दत्तात्रय खाडे, शामराव घुगे, मंगला मदने, प्रीती जाधव, फातेमा बाजी, वर्षा देशमुख, दीपिका एरंडे, अर्चना गोरडे, जयश्री राठोड, वैशाली इंगळे, सुनिता चितळकर,वंदना चव्हाण, कल्पना नाईक._ अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख श्री.सतीश कोळी यांनी कळविले आहे तसेच जिल्ह्यातील सर्व शिक्षक बंधू भगिनींनी दि.१७ मार्च २०२५ रोजी जिल्हा परिषद समोरील आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे_

## जेइएस मध्ये यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी



**जालना** : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार तथा महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व भारताचे उपपंतप्रधान स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती जेईएस महाविद्यालय जालना येथे साजरी करण्यात आली यावेळी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र सोनवणे हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.नानासाहेब गोरे मराठी विभाग प्रमुख प्रा .डॉ.यशवंत सोनूने आदि तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईंडींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ मार्च २०२५

## नव्या पीढीसाठी गावोगावी वाचनालये सुरू व्हावीत - खा. संदिपान भुमरे




**कन्नड (अरुण थोरात ):** मी अनेक वाचनालये पाहिली परंतु माझ्या राजकीय आयुष्यात पाहिलेले सहकार महर्षी बाळासाहेब पवार हे एकमेव वाचनालय आहे. या वाचनालयाच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी उपक्रम सुरू आहे. या ग्रंथालयाच्या माध्यमातून चांगले ग्रंथालय कन्नड तालुक्याला मिळाले. लोकनेते बाळासाहेब पवार यांचे फार मोठे योगदान आहे. कन्नड तालुक्यासाठी चांगले सामाजिक काम बापूसाहेब करीत आहे. नव्या पिढीच्या भवितव्यासाठी आता गावोगावी वाचनालये व अभ्यासिका सुरू व्हावेत असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगरचे खा. संदिपान भुमरे यांनी केले. दि. १५ मार्च रोजी कन्नड येथील सहकार महर्षी बाळसाहेब पवार वाचनालय व बाळासाहेब पवार फाऊंडेशन तर्फे सहकार महर्षी बाळसाहेब पवार जयंती निमित्त फिरत्या मोबाईल व्हॅन ग्रंथालयाच्या उदघाटन प्रसंगी ग्रंथालय आपल्या दारी या उपक्रमातंर्गत आयोजित कार्यक्रम प्रसंगी उदघाटक म्हणून ते उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ. दादा गोरे होते. तहसिलदार विद्याचरण कडवकर, वाचनालयाचे अध्यक्ष मानसिंह पवार, मा.आ. किशोर पाटील, उत्तमराव राठोड, संतोष कोल्हे, अहेमद अली, डॉ. मिलिंद पाटील, सागर जाधव, अशोकराव आहेर यांची उपस्थिती होती. प्रारंभी लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक करतांना मानसिंह पवार म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यासाठी चांगले वातावरण तयार व्हावे, त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, हा या वाचनालयाचा प्रयत्न आहे. शासनाने अशा उपक्रमांवर अधिक खर्च केला पाहिजे. गरिबांच्या मुलांना मोठे व्हायचे आहे पुढं जायचे आहे. ईमारत उभी करायला पैसे लागतात माणसं ऊभी करायला पैसे लागत नाही. प्रत्येक तालुक्यात वाचनालये व अभ्यासिका होणे आवश्यक आहे असे मत मांडून कार्यक्रमाची व वाचनालयाची माहिती दिली. मा. अप्पासाहेबांचे सामाजिक कार्य व विचार पुढे घेवून जाण्याचे काम या उपक्रमांच्या माध्यमातून होत आहे. असेही ते म्हणाले. मा.आ. किशोर पाटील, संस्कृती सोळुंके यांनी मनोगत व्यक्त केले. डिझाईनर अनिकेत मोरे यांच्या विशेष सत्कार करण्यात आला.अध्यक्षीय समारोप डॉ. दादा गोरे यांनी केला. ते म्हणाले बाळासाहेब पवार हे सामाजिक जिवनाचं भान असणारे नेते होते. मराठवाड्या च्या विकासासाठी त्यांना संघर्ष केला. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक योजना राबविल्या. मानसिंह पवार हे मला नव्या पिढीचे आदर्श वाटतात. हे ग्रंथालय सामाजिक जिवनाशी जोडून घेणारे एकमेव ग्रंथालय आहे असे विचार मांडले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी गोकुळसिंग राजपूत, सभापती मनोज राठोड, सुरेश डोळस, पांडुरंग घुगे, चंद्रकांत देशमुख, बाबासाहेब मोहिते, डॉ आनंद महाले, कृष्णा पाटील, मनोज पवार, प्राचार्य विजय भोसले, विश्वास मोतिंगे, गणपत खरे, साहेबराव अकोलकर, अॅड कृष्णा पाटील जाधव, माजी नगरसेवक उद्धव पवार अॅड राजेश कुलकर्णी, डॉ सदाशिव पाटील, शिवाजी थेटे, अशोक दाबके , कौतिकराव पवार, डॉ रमेश सूर्यवंशी, संपत केरे , राम पवार, सुनील पवार, आर व्ही शिंदे, श्याम महाले, मुख्याध्यापक संजय जाधव आदींसह नागरिक उपस्थित होते.सूत्रसंचलन डॉ. के . एल. भानुसे यांनी केले तर आभार डॉ. शिवाजी हुसे यांनी मानले. कायक्रमासाठी संयोजन समितीने परिश्रम घेतले.

## प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे पळसखेड चक्का येथील पाझर तलाव ३० वर्षापासून प्रलंबित



**देऊळगाव (महेश मुंढे) :** देऊळगाव राजा तालुक्यामध्ये काल शिवानी आरमाळ येथील राज्यपाल पुरस्कार युवा शेतकरी कैलास नागरे यांनी शेतीला खडकपूर्णा प्रकल्पामधून शिवनी आरमाळ धरणामध्ये पाणी सोडा ही मागणी केली असता पण पाणी मिळत नसल्यामुळे हातबल होऊन काल त्यांनी आपली होळीच्या दिवशी स्वत:ची होळी करून घेतली अशातच सिंदखेड राजा तालुक्यामध्ये पुन्हा एक प्रकरण समोर येत आहे सिंदखेड राजा तालुक्यामध्ये पळसखेड चक्का येथील पाचा मुऱ्याच्या खोऱ्यामधील तलाव ३० वर्षापासून शासनाच्या हलगर्जीपणामुळे प्रलंबित आहे शेतकऱ्याची शेतजमीन भूसंपादन झाली असून शेतकऱ्यांना त्याचा मोबदला सुद्धा मिळाला आहे आणि संबंधित विभागाच्या नावावर त्या सातबारा उल्लेख आहे हा तलाव लवकरात लवकर करण्यात यावा म्हणून शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने दिनांक २४/२/२०२५ व इतर दिनांक दिवशी आणि इतर विभागाला सुद्धा संबंधित विभागाला निवेदन दिलं असून ३१ मार्च पर्यंत हे काम मार्गी लागलं नाही तर त्या तलावाच्या भूसंपादन झालेल्या जमिनीमध्ये शेतकरी योद्धा कृती समितीचे वतीने अन्नत्याग आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा दिला आहे त्यात असे उल्लेख केले आहे सरकार मायबापा सांगा तुम्ही शेतकऱ्यांनी जगायचं कसं आता एक तर शेतीला पाणी द्या नाहीतर पाण्यासाठी शेतकऱ्याचा बळी घ्या असा निवेदनामध्ये उल्लेख केला असल्याने एकच खळबळ उडाली असून प्रशासन या निवेदनाकडे आणि या मागणीकडे कशा पद्धतीने पाहता का सरकारला परत पुन्हा शेतकऱ्याचा बळी घेणार का याकडे संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रशासनान कशा पद्धतीने आमच्या मागण्या पुढे नेणार की पाण्यासाठी पुन्हा शेतकऱ्याचा बळी घेणार का याकडे संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागलं आहे

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ मार्च २०२५

# खानदेशातील महान स्वातंत्र्य सेनानी लीलाताई पाटील



**(प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** खानदेशातील स्वातंत्र्य सेनानी लिलाताई उत्तमराव पाटील यांची आज १५ मार्च म्हणजेच जन्मदिवस (जयंती). अत्यंत शौर्यवान व कर्तृत्ववान अशा लिलाताई पाटील यांनी इंग्रजांच्या कोर्टकचेऱ्या जाळून अंगावर रोमांच उभे करणारे पराक्रम गाजविलेत. आम्हां कृतघ्न देशवासियांच्या विस्मरणात गेलेल्या या थोर सेनानीस विनम्र अभिवादन.तेजस्वी क्रांतिविरांगना :- लिलाताई उत्तमराव पाटील नाशिक जिल्ह्यातील साकोरे या छोट्याशा गावातील प्रखर सत्यशोधक वामनराव पाटील यांच्या पोटी जन्म घेतलेल्या व डॉ. उत्तमराव गिरीधर पाटील या अमळनेरच्या स्वातंत्र्यवीराचे सौभाग्य भाळी लावलेल्या लिलाताई पाटील यांची आज जयंती. (जीवनकाळ:१५ मार्च १९२२ ते १ मे १९८५) क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकार चळवळीतील तुफानसेनेच्या या सेनानीस भावपुर्ण अभिवादन. महात्मा गांधीसारखा युगपुरुष नेता, साने गुरुजींसारखा मातृहृदयी मार्गदर्शक, वामनराव पाटलांसारखा सत्यशोधकी पिता, उत्तमरावांसारखा देशभक्त क्रांतिकारी जोडीदार लाभलेल्या या अंतर्यामी व संवेदनक्षम बंडखोर महिलेचा देशाप्रती असलेला त्याग अंगावर रोमांच उभे करणारा व काळीज पिळवून टाकणारा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जन्मुन दर महिन्यास आजही स्वातंत्र्यसैनिकाचे पेन्शन घेणाऱ्या अनेक ‘थोर’ नकली स्वातंत्र्यसैनिकांचे सद्यस्थितीला कौतुक होत असताना किंवा ज्यांनी खऱ्या क्रांतिकारकांची हेटाळणी करुन ब्रिटीशांची चापलुसी केली अशा बेगडी स्वातंत्र्यवीरांचे सध्या गौरवीकरण होत असतानाच्या पार्श्वभूमीवर लिलाताईंसारखे अव्वल बावनकशी सोनेरी व्यक्तीमत्त्व आज विस्मरणात जात आहेत यापेक्षा दुर्दैव ते काय? फारसे प्राथमिक शिक्षण न झालेल्या परंतु श्रीमंत व सुखवस्तु मराठा कुटुंबात जन्मलेल्या लिलाताईंच्या आयुष्यात उत्तमरावांसोबत १९३७ मध्ये झालेल्या विवाहादरम्यान घडलेल्या घडामोडीतून पुरोगामी सामाजिक विचारांचे बिजारोपण झाले. डॉ. उत्तमराव पाटील म्हणजे साने गुरुजींचा पट्टशिष्य व महात्मा गांधींच्या विचारांचा पाईक. लिलाताईंचा विवाह हातात रिकामी पिशवी एवढीच ईस्टेट असलेल्या या कफल्लक देशभक्त तरूणाशी लग्नसोहळ्यातील एकही पारंपारिक विधी न करता, जाड्याभरड्या खादीच्या साडीवर, एका दलितबांधवाच्या पौरोहित्याने, गळ्यात मंगळसुत्र न घालता पार पडला. खानदेशातील त्या पंचक्रोशीत अशाप्रकारचा सत्यशोधकी विवाह समारंभ पहिल्यांदाच संपन्न होत होता. जळगाव जिल्ह्यातील डांगरी या गावातील सासरी गेल्यानंतर तेथे अठराविश्वे दारिद्र्य असलेल्या चंद्रमौळी झोपडीत संसार सुरु करताना लिलाताईंना त्यांच्या विवाहातील बंडखोरीमुळे भावकीतील नातलगांकडुन सुरुवातीला सामाजिक बहिष्काराला सामोरे जावे लागले. सख्ख्या चुलत सासरची मंडळी त्यांना महाराच्या हातुन लग्न लावुन घेतले अशी हेटाळणी करित विहीरीवर पाणी सुद्धा भरु देत नसत. मात्र घरातील सासू, दिर, पती यांच्या पुरोगामीत्वाच्या भक्कम पाठबळामुळे त्यांनी या सर्व बाबींवर लिलया मात केली. ‘डोईवरचा पदर आला खांद्यावरी, जाईन मी भरल्या बाजारी’ या संत जनाबाईंच्या ७०० वर्षापुर्वी लिहिलेल्या स्त्रीसशक्तीकरणाच्या ओवीप्रमाणे लिलाताईंनी अत्यंत बाणेदारपणे व विनयतेने डोक्यावरचा पदर खांद्यावर घेत स्वतःचा संसार धार्मिक व सामाजिक रूढीबंधनांना टिच्चून समर्थपणे पेलला. त्या काळी खानदेशी परिसरात स्त्रीने स्वत:च्या पायाचे नखसुद्धा बाहेर दिसु देणे म्हणजे सामाजिक निंदा नालस्तीचा विषय असताना लिलाबाईंना काय जाच झालेला असावा याची आपण आज कल्पना करू शकतो. १९३७-३८ म्हणजे आजपासून ८७ वर्षापुर्वीचे बंडखोरीचे हे चित्र आज आम्हां सर्वांना विस्मयचकीत करणारे आहे.

लिलाताई पाटिल यांचे संपुर्ण कुटुंबच स्वातंत्रता चळवळीसाठी बलिदानाच्या वेशीवर उभे असल्याचे आपल्याला दिसुन येते. लिलाताईंच्या वयोवृद्ध सासु स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगात गेल्या; तुरुंगातच त्यांचे निधन झाले. पती डॉ. उत्तमराव पाटील यांचे भारत छोडो आंदोलनातील व प्रतीसरकार (पत्रीसरकार) चळवळीतील योगदान स्वातंत्र्यलढ्यात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याजोगे विलक्षण आहे. लिलाताईंचे दोन्ही धाकटे दिर शिवाजीराव पाटील व दशरथराव पाटील स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या त्यांच्या आंदोलनांमुळे तुरुंगात होते. ( शिवाजीराव पाटील म्हणजे महाराष्ट्राचे माजी मंत्री व अभिनयसम्राज्ञी स्मीता पाटील यांचे पिता) एवढेच नव्हे तर लिलाताईंचे वडील वामनराव पाटील, त्यांचे मामसासरे कॅप्टन विश्वासराव पाटील, सख्खे मामा गोविंदराव यांच्यासह त्यांच्या रक्ताच्या अनेक आप्तांनी स्वातंत्र्यलढ्यात जीव धोक्यात घालून सक्रीय योगदान दिले. एकंदरीत लिलाताईंचे कुटूंबच स्वातंत्र्यसैनिकाची खाण होती असे म्हटल्यास अजिबात अतियोशोक्ती होणार नाही. एकाच कुटूंबाच्या उज्ज्वल देशभक्तीचे असे दुसरे उदाहरण भारतीय स्वतंत्रता चळवळीत आढळत नाही.

विवाहाआधी फारसे शिक्षण नसलेल्या लिलाताईंनी डॉक्टर पतीच्या मार्गदर्शनातून नर्सिंगचा अभ्यासक्रम पुर्ण केला. १९३९ ला अंमळनेर येथे गोरगरीबांकरिता या उभयतांनी दवाखाना सुरु केला. मात्र अवघ्या १-२ वर्षातच त्यांना हा दवाखाना त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील इतर व्यस्ततेमुळे तसेच इंग्रजाच्या जाचामुळे बंद करावा लागला. मात्र त्यांनी खेडोपाडी दिलेल्या वैद्यकीय सेवेमुळे त्यांच्या भावकीतील व परिसरातील आप्तजनांनी त्यांच्या कुटूंबावरील घातलेला सामाजिक बहिष्कार नाहिसा झाला. उत्तमराव पाटलांना कट्टर सामाजिक शत्रु मानणा-या चित्रमआप्पा या गावप्रमुखाची स्त्री तीच्या बाळंतपणात लिलाताईंनी स्वत:च्या वैद्यकीय कौशल्याने सोडविली. बाळासह त्या भगिनीला जीवदान दिले. तेव्हा तर चित्रम आप्पांनी मनातील सर्व किल्मीषे दुर सारून लिलाताईंना त्या काळी उत्तुच्च समजल्या जाणा-या उंच चौरंगावर बसवित चांदीच्या थाळी- निरंजनाने ओवाळुन सत्कार केला व स्वत:च्या द्वेषाची सांगता केली.

महात्मा गांधींच्या प्रेरणेने स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतल्याने लिलाताईंना वयाच्या १८ व्या वर्षीच १९४० ला धुळे येथील तुरुंगात ब्रिटीशांनी वैयक्तीक सत्याग्रहाच्या आरोपाखाली कोठडीत टाकले. १९३७ ते १९४२ या कालावधीत लिलाताईंनी खादी, कॉंग्रेसविचार, सभासद नोंदणी, प्रभातफेरी, ग्रामसफाई, संडाससफाई, मजूर- शेतकरी संघटन इत्यादी सामाजिक कार्यात सक्रीयपणे सहभाग घेतला. १९४२ च्या ऑगष्ट महिन्यात गांधींनी सर्व देशवासियांना दिलेली ऑगष्टक्रांतीच्या आंदोलनाची हाक शिरोधार्ह मानुन पाच महिन्यांच्या गर्भवती असलेल्या लिलाताईंनी या आंदोलनात उडी घेतली ही बाब आज अविश्वसनीय वाटते. त्यांनी ऑगष्ट १९४२ मध्ये पती उत्तमरावांसह ‘भारत छोडो’ या आंदोलनाची क्रांतिज्योत ‘नही रखना नही रखना, सरकार जालीम नही रखना’ अशा घोषणा देत पेटविली. १५ ऑगष्ट १९४२ ला लिलाताई, उत्तमराव व इतर सहका-यांनी अंमळनेर येथील न्यायालय, पोष्टऑफीस व स्टेशन या ब्रिटीशांच्या मर्मस्थानावर मोर्चा काढुन या तिनही इमारतींची पार राखरांगोळी केली. ब्रिटीश सरकारकरिता हा अत्यंत मोठा धक्का होता. त्यामूळे या आंदोलनादरम्यान शिपायांनी गोळीबार सुद्धा केला. इंग्रजांनी उत्तमराव यांच्याविरुद्ध या कारनाम्याकरिता डेथ वारंट काढल्याने १५ ऑगष्टच्या रात्रीतून ते भुमिगत झाले. मात्र परत लगेच दुस-या दिवशी १६ ऑगष्ट १९४२ ला इंग्रजांनी लावलेला मार्शल लॉ तोडण्याच्या धारिष्ट्याचे लिलाताईंचे आंदोलन म्हणजे त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील सहभागाचा परमोच्च क्षण होय. लिलाताईंचे त्या दिवशीचे साहस बघितल्यास अंगावर रोमांच उभे राहतात. उत्तमरावांच्या गैरहजेरीत मात्र त्यांच्याच दिग्दर्शनाखाली लिलाताईंनी १६ ऑगष्टचे मार्शल लॉ भंगाचे आदोलन दिर दशरथ पाटील व काही मैत्रीणींच्या सहाय्याने यशस्वी केले. लिलाताई हातात तिरंगा झेंडा घेवुन या पाच-सहा तरूण आंदोलकांचे नेतृत्त्व करीत होत्या. त्यामुळे आदल्या दिवशीच्या जाळपोळीमुळे पित्त खवळलेल्या इंग्रज शिपायांनी या गटावर झडप घातली व अमानुष मारहाण केली. ‘ऑगष्ट क्रांती जिंदाबाद, इंग्रजी राज मुर्दाबाद’ अशा घोषणा देत असताना व तिरंगा झेंडा छाती-पोटाशी लिलाताईंनी कवटाळलेला असताना तो ताब्यात घेण्याकरीता शिपायांनी त्यांच्या पाठीवर मागुन पोलीसी दंड्याचे प्रहार केलेत. पण लिलाताई तिरंगा सोडत नाही हे बघून क्रोधाने उद्वीग्न झालेल्या शिपायांनी लिलाताईंच्या कमरेवर व ओटीपोटावर रायफलच्या दस्त्याने अमानवीय क्रुरतेने वार केलेत, त्यांना फरफटत नेत तुरुंगात डांबले. या अमानुष मारहाणीत झालेल्या दुखापतीमुळे लिलाताईंचा गर्भपात झाला. भारतमातेची सेवा करण्याच्या हट्टात या माऊलीचे मात्रुत्त्व इंग्रजांच्या जाचामुळे हिरावले गेले. अंमळनेर येथील शासकीय कार्यालयाची जाळपोळ या तत्कालीन शासनद्रोही गुन्ह्याकरिता साडेसहा वर्षे व मार्शल लॉ भंग गुन्ह्याकरिता साडेसात वर्षे अशी एकूण चौदा वर्षांची शिक्षा त्यांना सुनावण्यात आली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात १४ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झालेल्या लिलाताई ह्या भारतातील पहिल्याच महिला असाव्यात.

लिलाताईंच्या या शौर्यगाथेवर लिहिलेल्या ‘ऑगष्ट बुलेटिन’ या अंकातील ‘ लिलाताईचा संसार’ या लेखात साने गुरुजींनी या माऊलीप्रती प्रचंड आदरभाव व्यक्त केलेला आहे. ‘लिलाप्रमाणे निर्मळ आणि निष्पाप, सरळ आणि निर्भय, सेवामय आणि त्यागमय स्त्री बघितली नाही.’ असे गुरुजींनी या लेखात ठळकपणे नमुद केले. ऑगष्ट १९४२ पासुन त्यांचा प्रवास धुळे तुरुंग- ठाणे तुरुंग- येरवडा तुरुंग असा झाला. येरवडा तुरुंगात स्वातंत्र्यलढ्याची शिक्षा भोगत असताना कडक पहाऱ्याच्या या तुरुंगातुन अंगात १०१ डिग्री ताप असताना लिलाताईंनी इंग्रज शिपायांच्या हातावर तुरी देत केलेल्या पलायनाचा वृतांत छत्रपती शिवरायांच्या आग्र्याहुन केलेल्या पलायनाची आठवण व्हावी एवढा रहस्यमयी व रोमांचकारी आहे. अमळनेरच्या जळीतकांडानंतर उत्तमराव पाटलांनी भुमिगत होवुन क्रांतिसिंह नाना पाटीलांच्या नेतृत्त्वात प्रतिसरकार चळवळीत कार्य केले. इंग्रज सरकारच्या त्यांच्या शोधामागील ससेमिऱ्यामुळे ते महादू धनगर या खोट्या नावाने वावर करीत. येरवडा तुरुंगातील पलायनानंतर लिलाताईंनी सुद्धा भुमिगत होत क्रांतिसिंहांच्या चळवळीत पतीच्या खांद्याला खांदा भिडवत प्रतिसरकार चळवळीतील तुफान सेनेच्या महिला सैनिकांची सेनानी म्हणुन नेतृत्व केले. या चळवळीत लिलाताईंनी खांद्यावर बंदूक घेवून नाना पाटलांच्या ग्रामराज्य संकल्पीत चळवळ बळकट करण्याचा प्रयत्न केला. १९४६ पर्यंत उत्तमराव व लिलाताई यांच्या नावे असलेले सरकारी सर्चवारंट रद्द होईपर्यंत या जोडप्याने भुमिगत राहून महाराष्ट्रभर सामाजिक क्रांती पेटवत ठेवण्याचा प्रयत्न केला. नंतर हे सर्चवारंट रद्दबादल झाल्यानंतर संपुर्ण महाराष्ट्रभर या उभयतांचे लोकसत्कार झालेत. मात्र पत्रीसरकारच्या यशामूळे व जनाधाराच्या इर्ष्येमुळे महाराष्ट्रातील काही कॉंग्रेसी नेत्यांना पत्रीसरकारच्या या नेत्यांचा जनतेने केलेला असा अभुतपुर्व सत्कार व सन्मान मानवला नाही. बाळासाहेब खेर व मोरारजींच्या मुंबई सरकारचा तर फारच जळफळाट झाला. त्यामुळे उत्तमराव व लिलाताईंवर सभाबंदी, भाषणबंदीचे हुकुम कॉंग्रेस नेतृत्वाकडून बजावण्यात आले. प्रतिसरकारबाबत कॉंग्रेसी नेत्यांमध्ये असलेला द्वेष व इर्ष्येमुळे पुढे लिलाताई व उत्तमरावांनी समाजवादी पक्षाची कास धरली. या उभयतांच्या सत्कारानिमीत्त ठिकठिकाणी लोकांनी दिलेली एकूण ५०,००० रुपयांची देणगी या उभयतांनी समाजवादी पक्षाला अर्पण केली. मात्र काही काळानंतर, विशेषत: १९४८ नंतर समाजवादी पक्षाच्या ध्येय उद्दीष्टांच्या प्राधान्याबाबत त्यांचे मतभेद निर्माण झाल्याने कोणताही कडवटपणा न आणता लिलाताई व उत्तमरावांनी पुढे शेतकरी कामगार पक्षाचे कार्य केले. स्वातंत्र्योत्तर काळात लिलाताईंनी स्त्रीशिक्षण, स्त्रीमुक्ती, सहकारी संघटना, स्त्रीहोमगार्डदल इत्यादी सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य केले. १९४७ ला अमळनेर येथे जनता शिक्षण मंडळाची लिलाताईंनी मुहुर्तमेढ रोहून शेतकरी बोर्डींग व ट्रेनिंग कॉलेज सुरु केले. १९५२ पासुन त्या शिरपुर येथे स्थिरावल्या. तेथील नगर परिषदेच्या त्या सलग ९ वर्षे नगरसेविका होत्या. स्टँडींग कमीटीच्या महीला चेअरमन होण्याचा महाराष्ट्रातील पहिल्या महिलेचा मान त्यांना मिळाला. शिरपूर येथे वनिता सेवा मंडळ व कन्या विद्या मंदीर स्थापन करुन त्यांनी मुलींच्या शिक्षणाचा व महीला सशक्तीकरणाचा प्रयोग राबविला. १९७२ ते १९७६ या कालावधीत महाराष्ट्र विधानसभेच्या शिंदखेडा मतदारसंघाच्या जागरुक आमदार म्हणून लिलाताईंनी कार्य केले. शंकर पाटील यांनी लिलाताईंच्या साहसावर लिहीलेला ‘पक्षी पिंज-यातुन उडाला’ हा पाठ कधीकाळी इयत्ता सातवीच्या मराठी पाठ्यपुस्तकातुन विद्यार्थ्यांना शिकविल्या जायचा. लिलाताई पाटलांचे जीवन म्हणजे केवळ एका सत्याग्रही व भुमिगत स्वातंत्र्यसैनिकाची कथा नसून एका संपुर्ण कुटूंबाच्या अद्वितीय त्यागाची गाथा आहे. अशा या साध्यासुध्या मराठमोळ्या अंतर्यामी, परकियांच्या गुलामगिरीने व सामाजिक-राजकीय अन्यायाने संतप्त होणारी, त्यासाठी प्रथम सत्याग्रहाच्या व अंती सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने ब्रिटीशांशी प्राणपणाने लढणारी, प्राणभयाच्या संकटसमयीही न डगमगता बुद्धी शांत व स्थिर ठेवणारी, प्रसंगी मृत्यूला हेटाळणारी, ऐन तारुण्यात पोटातल्या बाळावर व उभ्या संसारावर निखारा ठेवणारी एक तेजस्वी क्रांतिविरांगना लिलाताई उत्तमराव पाटील यांचे १ मे १९८५ ला देहावसन झाले. भारतातील जनतेला अन्यायाने छळत असलेल्या कॅन्सररुपी ब्रिटीश सत्तेला उलथवून टाकणाऱ्या या रणरागिणीचा अंत त्यांच्या शरीराला पोखरणा-या कॅन्सरने झाला. ज्या महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय उत्थानाकरिता त्यांनी सर्वस्वाचा त्याग केला त्या महाराष्ट्र दिनीच त्यांच्या जीवन यज्ञाची सांगता व्हावी यापेक्षा दुसरा मोठा योगायोग नाही. ख-या स्वातंत्र्यसैनिकांना फितूर होवून किंवा ब्रिटीशांची माफी मागून स्वातंत्र्यद्रोह करणा-या अनेक महाभागांवर पुस्तके, कादंब-या, नाटके, चित्रपटे निर्माण होत असताना महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या ‘क्रांतिपर्व’ या ग्रंथाखेरीज (१९८७) इतरत्र कोठेही या रणरागिणीबद्दल विशेष अशी माहीती आज मिळत नाही, हे महाराष्ट्रीय जनतेचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. शिवरायांच्या कर्तृत्त्वस्पर्शाने पावन झालेल्या या महाराष्ट्राच्या सृजन मातीतून जन्मास आलेल्या या अतुल्य साहसी तुफान सेनानी लिलाताई पाटील यांच्या जन्मतिथीनिमित्त मानाचा मुजरा करीत आपण नतमस्तक होवूया.-

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १६ मार्च २०२५

# आयुष्याच्या प्रत्येक संकटात टिकून ठेवलेला संयम-तारांबळ




तारांबळ* हे अंबादास केदार यांचे आत्मकथन गणगोत प्रकाशनाकडून 15 ऑगस्ट 2021 रोजी प्रकाशित झालेलं आहे. या पुस्तकासाठी संतोष घोंगडे यांनी सुंदर असं मुखपृष्ठ केलेलं आहे. या पुस्तकाचे प्रकाशक गणगोत प्रकाशन देगलूर, जिल्हा नांदेड हे आहेत.या पुस्तकाचं स्वागतमूल्य 450 इतकं असून हे पुस्तक लेखकाने आपल्या हाडाची काड करून शिक्षण देणाऱ्या आपल्या मायबापास अर्पण केलेलं आहे. या पुस्तकासाठी ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मुसळे यांची पाठराखण लाभलेले आहे.

तारांबळ हा महाराष्ट्रातील ग्रामीण बोलीभाषेतला *शब्द' नुसता वाचला तरी अंगावर काटा येतो. ग्रामीण समाजिवनातील जिव्हाळ्याचा नसला तरी जिव्हारी लागणारा हा शब्द आहे. स्वतंत्र भारतातील प्रत्येक सर्वसामान्य कुटुंबातील माणसांनी हीच 'तारांबळ' अनुभवलेला तो कालखंड. देशाच्या स्वातंत्र्याच्या पंचविशीत भारतीय समाजव्यवस्थेत शिक्षणाची आस धरू लागलेला समाज आणि घरातील अठराविश्व दारिद्र्य जे आजही समूळ नष्ट झालेलं नाही. पिढ्यानपिढ्यांचं कौटुंबिक अज्ञान, अर्थिक, सामाजिक दृष्ट्या असलेलं मागासलेपण आणि बालवयातही सर्वसामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या मुलाने कौटुंबिक जबाबदारी पेलण्याचे ते दिवस. शिकण्याची जिद्द, चिकाटी, कौटुंबिक आर्थिक दौर्बल्याने खचून न जाता संघर्ष करण्याची तयारी. आयुष्याच्या प्रत्येक संकटात टिकवून ठेवलेला संयम. याचं वेळोवेळी दर्शन या आत्मकथनामध्ये आपल्याला दिसून येतं. लेखकाची लिहिण्याची शैली ग्रामीण मराठवाडी बोलीतील असून, लिखाणातील निरागसता ही लेखकाच्या लिखाणाच्या प्रेमात पडायला भाग पाडणारी गोष्ट आहे. या कथानकात कसल्याही प्रकारची ओढताना अथवा शब्दांची जुळवा जुळवा
आपल्याला दिसत नाही.तर जे लेखकाने प्रत्यक्ष जगलेलं, भोगलेलं, अनुभवलेलं कौटुंबिक समाजजीवन व त्याचं भयावह चित्र आपल्या डोळ्यासमोर उभा केलेलं आहे. ज्या समाजामध्ये शिक्षण हे त्यांच्या गावालाही नव्हतं. फक्त पोटासाठी जगत राहणं. भूक आणि भाकरीचा संघर्ष करत राहणं. अन्न वस्त्र निवारा याच गरजेच्या गोष्टी समजून याच्यासाठी आयुष्य काढत राहणं अशा परिस्थितीत एका सर्वसामान्य कुटुंबात अंबादास केदार यांचा जन्म होतो. एकूण पाच मुलं आणि आई वडील असे हे कुटुंब. लेकरांच्या भुकेसाठी रात्रंदिवस वन-वन करणारे आई-वडील, त्याच्यातच जगाच्या बरोबरीने राहत असताना शिकावं लागणं किंवा आपल्या वाट्याला आलेलं अज्ञान दूर करण्यासाठी उपाय शोधणं, त्यासाठी आपण जे कष्ट भोगतो आहे आपण जे कष्टप्रद जीवन जगत आहे त्याच्यातून आपल्या पुढच्या पिढीला मुक्तता मिळाली पाहिजे याच्यासाठी धडपडणारे त्यांचे आई-वडील.त्याच तळमळीने शिक्षण घेणारे आणि आई-वडिलांचा आदर करणारे अंबादास. सुसंस्कारी कुटुंब सुसंस्कारी मुलं त्यांच्या वाट्याला आलेलं दारिद्र्य. त्या दारिद्र्यातून बाहेर पडण्यासाठी ची धडपड, चिकाटी, शिक्षणासाठी कोणत्याही प्रकारचे कष्ट करण्याची तयारी या कथेतील प्रत्येक शब्द शब्दातून आपणाला जाणवते.तारांबळ कुणाच्या वाट्याला नसते. तारांबळ ग्रामीण जीवनातील प्रत्येक कुटुंबाच्या पाचवीलाच पुजलेली असते. परंतु ही माणसं तारांबळीन खचून जात नाहीत. रोजच्या येणाऱ्या दिवसाला पाठ देत राहतात. एकमेकांना आधार देत राहतात. एकमेकांना बळ देत राहतात. एकमेकांच्या खंबीरपणे पाठीशी उभी राहतात. कधी कधी त्रासदायक ठरणारी माणसं सुद्धा ग्रामीण भागात एकमेकांच्या उपयोगी पडतात. याचं सुंदर दर्शन शब्दा शब्दातून अंबादास केदार आपल्याला घडवून आणतात. अंबादास केदार यांना शिक्षणाची आवड तर आहे, शिकायचं तर आहे परंतु ते म्हणावे तितके हुशार नाहीत, बुद्धिमान नाही असा त्यांचा समज आहे. प्राथमिक शाळेत शिकत असताना त्यांना आलेले अनुभव आणि त्यांची कौटुंबिक परिस्थिती त्यामुळे शिकताना होणारी तारेवरची कसरत त्यांनी वेळोवेळी या कथानकात सांगितलेली आहे. जेव्हा ते दहावीच्या वर्गामध्ये जातात तेव्हा त्यांना खूप आनंद होतो. ते जिद्दीने चिकाटीने अभ्यास करतात त्या परिस्थितीत शिक्षणासाठी ओढाताण होत असताना त्यांना अनेक वेळा मजुरी करावी लागते. पाच दहा रुपयांसाठी किंवा शाळेतील फी साठी अनेक वेळा अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागते. दहावीच्या वर्षातील एक दोन प्रसंगाची त्यांनी वर्णन केल्यानंतर आपले डोळे अचानक गळायला लागतात. दहावीच्या परीक्षेत फी भरायला लेखक कडे पैसे नसतात, लेखक पैशाची मागणी मामाकडे करतात, तेव्हा मामाकडून नकार मिळतो. 120 रुपयासाठी लेखक मामाच्या गावावरून आपल्या गावाकडे चालत जातो. तिथेही पैसे मिळत नाही. तेव्हा लेखक वडील ज्या गावात काम करत आहेत त्या गावात चालत जातात. लेखकाला पाहून लेखकाची वडील विचारतात.."तू का आलास? " तेव्हा लेखक सांगतात, "मला शाळेची फी भरायची आहे. " फी ची रक्कम कळल्यानंतर वडील नवल करतात 120 रुपयासाठी दोन वेळा माझ्या मुलाला इतक्या दूरवरून माझ्याकडे चालत यावे लागले. त्याप्रसंगी आर्थिक परिस्थितीने विकल असलेल्या समाजातील भयावहता मनात काहूर निर्माण करते.

इयत्ता दहावी मध्ये लेखक चार ते पाच वेळा नापास होतात. 10 वी काढण्यासाठी लेखकाची तब्बल तीन वर्षे वाया जातात. त्या तीन वर्षाचे रिझल्ट घेऊन अकरावीच्या ऍडमिशन साठी फिरताना लेखकांनी त्यांची उडालेली तारांबळ येथे नोंद केलेली आहे. त्याचप्रमाणे अकरावीत ऍडमिशन घेण्यासाठी लागणारे पैसे ,कौटुंबिक गरजा भागवण्यासाठी लागणारे पैसे, वह्या पुस्तकासाठी लागणारे पैसे या कारणांनी लेखकाला दहावीच्या वयापासूनच सिमेंटच्या गाडीवर मुंबईला जाऊन हमाली करण्याची वेळ येते. इतक्या लहान वयात उन्हाळ्यात सुट्टी दिवाळी सुट्टी लेखक खेळण्याकुदण्याच्या वयात देखील सतत काम करत असतात. शाळेच्या दिवसातही बऱ्याच वेळा लेखकाला दिवसपाळी, रात्रपाळी या परिस्थितीत काम करावे लागते. योगायोगाने अकरावीनंतर चांगले कॉलेज त्यांना भेटते .कमवा आणि शिका योजनेमध्ये त्यांना शिक्षण घ्यायला संधी भेटते. चांगले शिक्षक भेटल्यामुळे वस्तीगृहात राहण्याची संधी मिळते. परंतु पाचवीला पुजलेलं दारिद्र्य मात्र हटता हटत नाही. येणारी संकट मात्र थांबायचं नाव घेत नाहीत. या सर्व परिस्थितीचे वर्णन वाचत असताना ग्रामीण परिस्थिती भोगलेल्या माणसाच्या मनात कालवा कालव झाल्याशिवाय राहत नाही. डोळे भरून आल्याशिवाय राहत नाहीत. प्रत्येक पान वाचत असताना डोळ्यातून केव्हा अश्रू गळायला लागतात हे कळतही नाही. हे चित्र पाहत असताना आज देखील समाजातील शैक्षणिक किंवा सामाजिक परिस्थिती फारसा काही बदल झाला असेल असं वाटत नाही. शैक्षणिक ध्येय धोरण बदलत असताना, आधुनिकतेच्या वाटेने प्रवास करत असताना, आपण चंद्राच्या आणि मंगळाच्या गप्पा मारत असताना, व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्याला जागतिक पातळीवर तयार करण्याची स्वप्न पाहत असताना, सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या घरावर छप्पर आहे की नाही त्याच्या अंगात गणवेश आहे की नाही किंवा दोन वेळचं त्याला जेवायला भेटते की नाही या गोष्टीचा विचार देखील शासनाकडून व्हायला हवा. अशा प्रकारची समस्या किंवा प्रश्न अंबादास केदार यांचा आत्मकथन वाचत असताना आपल्याला वेळोवेळी जाणवतात. आज जरी मध्यान भोजनाने किंवा मोफत पाठ्यपुस्तक वाटप केल्यामुळे पाठ्यपुस्तकाचा आणि मध्यान भोजनाचा प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तरावरील प्रश्न सुटलेला असला तरी विद्यार्थ्यांकडून वाढत्या शैक्षणिक अपेक्षा त्यानुसार त्यांच्याकडे असणारा अपुरा साधनपुरवठा, त्यामुळे मनामध्ये प्रश्न निर्माण होतो की आजच्या समजव्यवस्थेत देखील अंबादास केदार यांच्यासारखे किंवा आपल्यासारखे असे किती विद्यार्थी शिक्षणापासून वंचित असतील. किती आई-वडिलांच्या वाट्याला अजूनही हे दारिद्र्य आलेलं असेल. अंबादास केदार यांच्यासारखे सगळेच विद्यार्थी सहनशील जिद्दी, चिकाटीचे आणि अभ्यासू असतील का ?त्यांना आजची ही परिस्थिती बदलायची असेल का ?अंबादास केदार यांचे आत्मकथन वाचत असताना शिक्षणासाठी कधी त्यांच्या वडिलांना दुभती म्हैस विकावी लागते. कधी शेतातील आंब्याचं झाड विकावं लागतं,कधी घरावरचे पत्रे विकावे लागतात. एक वेळ अशी येते की अंबादास केदार यांच्या वडिलांना स्वतःच शेत आणि घर देखील विकावं लागतं .परंतु या परिस्थितीने घाबरून न जाता अंबादास केदार आणि त्यांचे आईवडील व सर्व कुटुंब येणाऱ्या प्रत्येक वादळामध्ये खंबीरपणे उभे राहतात. जगण्यासाठी आणि शिक्षणासाठी धडपडणारं हे कुटुंब किती धाडसी आहे, किती धडपडणारं आहे, किती कष्टाळू आणि आपल्या जीवनाशी किती प्रामाणिक आहे हे आपणाला या कथानकातून वेळोवेळी जाणवतं. अंबादास केदार बी.ए पूर्ण करतात. एमए पूर्ण करतात. बीएड पूर्ण करतात. हे करत असताना त्यांना वेळोवेळी तारेवरची कसरत करावीच लागत असते. बीएड झाल्यानंतर नोकरीच्या पूर्वी त्यांना लग्न देखील करावा लागतं. अशा परिस्थितीत अगोदरच खाण्यापिण्याची वांदे असताना त्यात आणखी एका माणसाची भर पडते. आणि त्यावेळी जी कुटुंबाची छिन्नविछिन्न अवस्था होते ती वाचताना काळीज कातरून जातं. अंगावरती शहारे येतात. शिक्षक झाल्यानंतर देखील जेव्हा अंबादास केदार यांना मजुरीवर जावं लागतं त्यावेळेस काळजाच्या चिंधड्या चिंधड्या होतात. पण माणसाच्या आयुष्यात सुख आणि दुःख हे कायम आहे. आता कुठे अंबादास केदार यांच्या आयुष्यात सुखाचे दिवस यायला लागतात. याच परिस्थितीत लेखकांची वडील यांचे दुःखद निधन होतं. लेखकांचे कुटुंब या दुःखातून सावरते नसावरते तोवर पुन्हा लेखक आपल्या आईलाही गमावतात. आणि केदार कुटुंबीयांवरती दुःखाचा डोंगरच कोसळतो. लेखक या घटनेने घाबरून जातात. त्यांच्या मनामध्ये एक प्रकारची भीती निर्माण होते .परंतु संकट येतच राहणार माणसाने त्या संकटाना मान्य करून तोंड देत राहिलं पाहिजे. यासाठी लेखक सतत प्रयत्नशील आहेत. आणि त्यांच्या प्रयत्नाला सातत्याने यश येत राहो हिच सदिच्छा.

**शंकर अभिमान कसबे**
**मु.पो.सुर्डी ता. बार्शी जि. सोलापूर**
**संपर्क.** 8805512813